# पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

## प्रेस नोट दिनांक :-२८/१०/२०२२

---

## जबरी चोरीच्या गुन्ह्यातील तिनही आरोपी जेरबंद
## नेर पोलीस स्टेशनची कामगिरी

दिनांक-३०/०९/२०२२ रोजी फिर्यादी संतोष दादाराव सहस्त्रबुध्दे रा. विरगव्हाण हा त्याची एर्टीगा गाडी क्रं. MH-43-AN-2963 घेवुन नेर येथे हजर होता. फिर्यादी हा गाडी भाड्याने देत असल्याने त्याचेकडे नमुद दिवशी तिन अज्ञात ईसम आले व मोबाईल टॉवर लावण्याकरिता सर्व्हे करण्याकरिता मुर्तीजापूर कडील गावामध्ये जावुन पाहणी करणे असल्याने फिर्यादी याची गाडी भाड्याने केली. फिर्यादी हा स्वत:च चालक मालक असल्याने तो अज्ञात तिन ईसमांना नेर येथुन घेवुन निघाला. त्याचे गाडीतील तिन अज्ञात ईसमांनी फिर्यादी यास रात्रीपर्यंत फिरवुन मुर्तीजापूर जवळील शेनगांव येथे रात्री २२.३० वाजता दरम्यान गाडी थाबंवुन फिर्यादीला रस्त्याचे बाजुला नेवुन झाडाला दोराने बांधले व त्याचे जवळील मोबाईल, नगदी रु. १६००/- व एर्टीगा गाडी क्रं. MH-43-AN-2963 असा एकुण ५,०८,६०० रुपयाचा मुद्देमाल जबरीने चोरुन घेवुन पसार झाले. तेव्हा फिर्यादी याने त्याची कशीतरी सुटका करुन जवळ असलेले मुर्तीजापूर ग्रामिण पोलीस स्टेशन गाठले. सदर घटनेची सुरवात पोस्टे नेर येथुन असल्याने मुर्तीजापुर येथुन कागदपत्र पुढील तपासकामी प्राप्त होताच पोस्टे नेर येथे दिनांक-०१/१०/२०२२ रोजी अपराध क्रं. ३०८/२०२२ क. ३९२. १२० (ब),५०६ भा.दं.वि. प्रमाणे दाखल करुन तपास सुरु करण्यात आला.

गुन्ह्याचे तपासादरम्यान सायबर सेल, यवतमाळ यांचे मदतीने तांत्रीक बाबींवर तपास करुन सुरवातीला आरोपी नामे १) अविनाश भाउराव इंगळे वय ३२ वर्षे रा. साखरी ता. अंजनगांव सुर्जी यास निष्पन्न केले व नेर येथील तपास पथकाने त्यास त्याचे गावांतुन ताब्यात घेतले. आरोपी अविनाश भाउराव इंगळे यास केलेल्या विचारपुसवरुन ईतर दोन आरोपी नामे २)विनोद ज्ञानेश्वर उघडे वय ४५ रा. साखरी, ३) मनोहर सहदेवराव खुंटे वय ४८ रा. अचलपुर यांना काल रोजी ताब्यात घेवुन रातरी अटक करण्यात आली. तपासादरम्यान आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिली असुन आरोपी सध्या पोलीस कस्टडी रिमांड मध्ये आहेत व पुढील तपास सुरु आहे.

सदर गुन्हा उघडकीस आणन्याची कार्यवाही, डॉ. पवन बन्सोड पोलीस अधीक्षक, यवतमाळ, डॉ. के. ए. धरणे अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ, आदित्य मिरखेलकर सहायक पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी, दारव्हा यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि रामकृष्ण जाधव ठाणेदार पोस्टे नेर, सपोनि विकास मुंढे, सायबर सेल, पोउपनि गजानन अजमिरे, पोस्टे नेर, पोलीस नाईक नितेश राठोड, राजेश वानखेडे, पोस्टे नेर व पोशी सतिश सोनोने, अजय निंबोळकर, रोशनी जोगळेकर , प्रगती कांबळे, सायबर सेल यवतमाळ यांनी पार पाडली. सदर गुन्ह्यामध्ये आरोपींबाबत व गुन्हा उघडकीस येण्याकरिता काही ठोस पुरावा नसताना तपासपथकाने केलेल्या या कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक यांनी संपुर्ण तपास पथकाचे अभिनंदन करुन त्यांना बक्षीस जाहीर केले आहे.

S. R. Cauhane
P. R. O. Yavatmal.